**भाग-अ**

MHWS090005342019

दाखल दिनांक : १५.०७.२०१९
नोंदणी दिनांक : १५.०७.२०१९
निकाल दिनांक : ०६.०४.२०२६
कालावधी : ०६ व. ०८ म. २२ दि.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. ५८/२०१९** **निशाणी क्र.१०२**

गुन्हयाचा तपशिल
गुन्हा क्र. : १३१/२०१९
पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | वि.स.स.अभियोक्ता– श्री. एम.जी.शर्मा |
| आरोपी पक्ष | दिनेश गुलाब मोहिते व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. टी. ए. खान पटेल |

**भाग–ब**

**गुन्ह्याचा तपशील**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०७.०४.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०७.०४.२०१९ |
| दोषारोप दाखल तारीख | ०३.०७.२०१९ |
| दोषारोप निश्चित तारीख | १५.०७.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १४.०८.२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०४.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२.<br><br>३.<br><br><br>४. | **दिनेश गुलाब मोहिते**<br>वयः२२ वर्षे, धंदाः मजुरी<br>**पुष्पा गुलाब मोहिते**<br>वयः४९ वर्षे, धंदाः मजुरी<br>**मनिष उर्फ मंगेश गुलाब मोहिते**<br>वयः३२ वर्षे, धंदाः मजुरी<br>**मिथुन विश्वनाथ खोकले**<br>वयः२४ वर्षे, धंदाः मजुरी<br>सर्व रा. ग्राम–गोंडेगांव, ता.मानोरा, जि.वाशिम. | फौ.प्र.सं. कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस | फौ.प्र.सं. कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस | भा.दं.वि.चे कलम ३२४,५०४ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | –– | –– |

## भाग–क
## पुरावा तपशिल

अ. – अभियोगपक्ष / सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | यशोदा अजय राठोड | खबरी | निशाणी क्र.४७ |
| २. | इश्वदिप शरद पवार | पंच | निशाणी क्र.१६ |
| ३. | डॉ. दिपा दयाल चव्हाण | वैद्यकिय अधिकारी | निशाणी क्र.६७ |
| ४. | नंदकिशोर भिमराव देवकर | पंच | निशाणी क्र.७८ |
| ५. | विजय चतुर्सिंग जाधव | तपास अधिकारी | निशाणी क्र.८९ |
| ६. | अजय नारायण राठोड | जखमी साक्षीदार | निशाणी क्र.९५ |

ब. – आरोपींचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

क. – न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

## सरकारी / आरोपीचे न्यायालयातील निशाणी दस्तऐवज

अ– सरकारी दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | जबाणी रिपोर्ट | निशाणी क्र.४८ |
| २. | प्रथम खबर अहवाल | निशाणी क्र.४९ |
| ३. | जखमी फॉर्म | निशाणी क्र.६८ व ६९ |
| ४. | वैद्यकिय प्रमाणपत्र | निशाणी क्र.७० व ७१ |
| ५. | घटनास्थळ पंचनामा | निशाणी क्र.७९ |
| ६. | जप्ती पंचनामा | निशाणी क्र.९० |

ब. आरोपीचे दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क. न्यायालयीन दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| –– | –– | –– |

मुद्देमाल तपशिल

| अ.क्र. | साहित्य वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| –– | एक मुठगोटा | आर्टिकल–अ |

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक ०६ एप्रिल, २०२६

आरोपी यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराधाकरीता संपरिक्षीत केले आहे.

अभियोगपक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे.

२. दिनांक ०७.०४.२०१९ रोजी सकाळी ०७:३० वाजताचे सुमारास सौ. यशोदा अजय राठोड (यापुढे त्यांना सोयीकरता 'खबरी' म्हणुन संबोधीत करण्यात येते) व त्यांचे पती अजय नारायण राठोड व त्यांचा पुतण्या गोविंदा राजेश राठोड असे शेतात कचना पेटवत होते. त्यावेळी सर्व आरोपी त्यांच्या शेतातील नालामधील रेती चाळणीने गाळत असतांना दिसले. त्यामुळे खबरी व त्यांच्या पतीने आरोपींना ''तुम्ही आमच्या हद्दीतील रेती गाळून का नेत आहा '' असे म्हटले असता आरोपींनी त्यांना व त्यांच्या पतीला शिवीगाळ केली व ''नाला तुमच्या बापाचा आहे का'' असे म्हणाले. तसेच खबरी व त्यांच्या पतीला आरोपींनी लाथा-बुक्याने मारहण केली. आ.क्र.१ ने खबरी यांना मुठगोट्याने डोक्यावर मारले त्यामुळे त्यांचे डोके फुटून रक्त निघाले. त्यांचे पती मध्ये आले असता आ.क्र.२ ने त्यांच्या डोळ्याचे भुईवर काठीने मारले त्यामुळे त्यांचे डोक्यावर बेंड आले. तसेच आ.क्र.३ व ४ ने त्यांच्या पतीला चापटा बुक्याने मारहाण केली. खबरी व त्यांच्या पतीने आरडा ओरड केली असता त्यांचा पुतण्या गोविंद राठोड आला व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर खबरीने आरोपींविरुध्द मानोरा पोलीस ठाणेत रिपोर्ट दिला.

३. खबर नोंदविल्यानंतर आरोपींविरुध्द मानोरा पोलीस ठाणेत गुन्हा रजिस्टर नं.१३१/२०१९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. जाधव, पो.हे.कॉ.

(बक्कल नं.६५१) यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरील अपराध सिध्द करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने आरोपींविरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द दोषारोप (निशाणी क्र.२८) निश्चीत केले. त्यातील माहिती आरोपींना त्यांच्या बोली भाषेमध्ये वाचुन व समजावून सांगितली. ती त्यांना समजली. त्यानंतर त्यांचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपींनी प्रतिकथनामध्ये गुन्हा कबुल न करता खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. खटल्यामध्ये आरोपींविरुध्द पुरावा आलेने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन (निशाणी क्र.९८ ते १०१) नोंदविण्यात आले.

५. न्यायालयासमोरील पुराव्याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उध्दभवले त्यावर माझा निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०७.०४.२०१९ रोजी सकाळी ०७:३० वाजण्याचे सुमारास गोंडेगांव शिवार, ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमताने खबरी सौ. यशोदा अजय राठोड व त्यांचे पती अजय नारायण राठोड यांना मुठगोट्याने व काठीने मारहाण करुन जखमी केल्याचे आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमताने खबरी व त्यांच्या पतीला जाणीवपुर्वक शिविगाळ करुन त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपीं विरुद्ध कुठला गुन्हा सिद्ध झाला आहे काय ? | ... नाही |
| ४. | काय आदेश | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

६. आरोपींवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने एकूण सहा साक्षीदार म्हणजेच खबरी यशोदा अजय राठोड (साक्षीदार क्र.१), जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदार इश्वरदिप शरद पवार व नंदकिशोर भिमराव देवकर (साक्षीदार क्र.२ व ४ ), वैद्यकिय अधिकारी डॉ. दिपा दयाल चव्हाण (साक्षीदार क्र.३), तपासी अधिकारी श्री. जाधव (साक्षीदार क्र.५) व जखमी साक्षीदार अजय नारायण राठोड (साक्षीदार क्र.६) यांची साक्ष नोंदवली. तसेच कागदोपत्री पुराव्याकामी जबाणी रिपोर्ट (निशाणी क्र.४८), प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र.४९), जखमी फॉर्म (निशाणी क्र.६८ व ६९),वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी क्र.७० व ७१), घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.७९) व जप्ती पंचनामा (निशाणी क्र.९०) यावर विसंबला.

## कारणमिमांसा

मुद्दे क्र.१ व २ करीता :

७. खबरी (साक्षीदार क्र.१) यांच्या साक्षीनुसार घटनेच्या दिवशी सकाळी ०७:०० ते ०७:३० वाजताचे सुमारास ते, त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) व त्यांचा पुतण्या गोविंद त्यांच्या मौजे गोंडेगांव शिवारातील शेतामध्ये गहु फेटायला गेले असता त्यांना आरोपी क्र.१ ते ४ त्यांच्या हद्दीतील नाल्यातुन वाळू काढत असल्याचे दिसले. त्यावेळी त्यांनी आरोपींनी वाळू का काढत आहे अशी विचारणा केली असता आरोपींनी त्यांना व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांना चापटा–बुक्याने मारहाण करुन आ.क्र.१ ने त्यांच्या डोक्यावर दगड (आर्टिकल–अ) मारला. त्यानंतर ते घरी आले व त्यानंतर रिपोर्ट (निशाणी क्र.४८) व प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र.४९) दिले.

८. खबरी यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांच्या साक्षीनुसार दि.०७.०४.२०१९ रोजी सकाळी ०७:३० वाजताचे सुमारास मौजे–गोंडेगांव येथील त्यांच्या गट क्र.३०४ मधील शेतामध्ये ते, खबरी व त्यांचा पुतण्या गोविंद राठोड गव्हाचा पुजाणा जाळण्याकरीता गेले असता आरोपी त्यांच्या शेताच्या नाल्यातून रेती काढतांना त्यांना दिसले. त्यावेळी ते आरोपींना 'रेती काढू नका' असे म्हणाले. त्यावेळी आरोपी त्यांना 'तुझी शेती आहे का' असे म्हणाले त्यावेळी आ.क्र.२ ने त्यांच्या डाव्या डोळयाच्या भुवईवर मारले व आ.क्र.१ ने खबरीच्या डोक्यावर गोटा आर्टिकल–अ मारला. त्यावेळी त्यांचा पुतण्या गोविंद राठोड यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर ते घरी गेले व त्यानंतर खबरीने पोलिस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला.

९. वैद्यकिय अधिकारी डॉ. चव्हाण (साक्षीदार क्र.३) यांच्या साक्षीनुसार दि.०७.०४.२०१९ रोजी त्या ग्रामीण रुगणालय, मानोरा येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत असतांना पो.हे.कॉ. (ब.नं.१३१३) यांनी १०:१० वाजताचे सुमारास जखमी फॉर्म (निशाणी क्र.६८ व ६९) दिल्यानंतर त्यांनी अजय नारायण राठोड (साक्षीदार क्र.६) यांना व खबरी (साक्षीदार क्र.१) यांची वैद्यकिय तपासणी करुन वैद्यकिय प्रमाणपत्रे (निशाणी क्र.७० व ७१) दिले.

१०. तपास अधिकारी श्री.जाधव (साक्षीदार क्र.५) यांच्या साक्षीनुसार दि.०७.०४.२०१९ रोजी गुन्हा क्र.१३१/२०१९ चा तपास त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी जप्ती पंचनामा (निशाणी क्र.९०) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.७९) तयार केला, साक्षीदारांचे बयाण घेतले व दोषारोपपत्र दाखल केले. जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदार इश्वरदिप (साक्षीदार क्र.२) यांनी जप्ती पंचनामा त्यांचेसमक्ष तयार केल्याचे नाकारले आहे.

तसेच नंदकिशोर (साक्षीदार क्र.४) यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा त्यांचेसमक्ष तयार केल्याचे सांगितले. परंतु जप्ती पंचनामा त्यांचेसमक्ष तयार करण्याची बाब त्यांनी नाकारली आहे. म्हणून सदर दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

११. खबरी व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांच्या साक्षीनुसार दि.०७.०४.२०१९ रोजी सकाळी ०७:३० वाजण्याचे सुमारास ते त्यांच्या मौजे गोंडेगांव शिवारातील शेतामध्ये गहु फेटायला गेले असता त्यांना आरोपी क्र.१ ते ४ त्यांच्या हद्दीतील नाल्यातुन वाळू काढत असल्याचे दिसले. त्यावेळी त्यांनी आरोपींना वाळू का काढत आहे अशी विचारणा केली असता आरोपींनी त्यांना चापटा–बुक्याने मारहाण करुन आ.क्र.१ ने खबरी यांच्या डोक्यावर दगड (आर्टिकल–अ) मारला. परंतु या दोन्ही साक्षीदारांनी सदर नाला सरकारी असून तो नाला त्यांच्या शेताच्या हद्दीत देखील नसल्याचे व त्या नाल्याची नोंद त्यांच्या शेताच्या सातबारामध्ये देखील नसल्याचे कबुल केले. तसेच आरोपी नाल्यातुन रेती काढत असल्याची तक्रार त्यांनी तहसिलदार यांच्याकडे केल्याचे देखील अभिलेखावर काहीही आलेले नाही. त्यामुळे सदर नाल्यातील वाळू काढत असल्याबद्दल या दोन्ही साक्षदारांना आरोपींकडे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याशिवाय खबरी यांनी घटनेच्यानंतर पोलिस स्टेशनला ते, त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) व त्यांचा पुतण्या गोविंद राठोड यांच्यासोबत त्यांच्या गावातील नंदूच्या ऑटोमधून आल्याचे सांगितले. परंतु अभिलेखावर त्यांचा पुतण्या गोविंद राठोड व सदर नंदू यांची साक्ष उपलब्ध नाही. तसेच खबरी व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.३) यांनी त्यांचा पुतण्या गोविंद राठोड यांनी सोडवा सोडव केल्याचे सांगितले. परंतु अभिलेखावर सदर गोविंद राठोड यांची साक्ष उपलब्ध नाही. याशिवाय खबरी यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांच्या साक्षीनुसार दि.०७.०४.२०१९ रोजी सकाळी ०७:३० वाजताचे सुमारास मौजे–गोंडेगांव येथील त्यांच्या गट क्र.३०४ मधील शेतामध्ये घडल्याचे

सांगितले. परंतु सदरील बाब पोलिसांना दिलेल्या बयाणात नसल्याचे त्यांनी कबुल केले. त्यामुळे सदर बाब ही सुधारीत स्वरुपाची आहे. खबरी व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांनी घटनेनंतर खबरी यांची साडी व दस्ती रक्ताने माखल्याचे सांगितले. परंतु या दोनही साक्षीदारांनी त्या वस्तु पोलिसांनी मागितली नसल्याचे व त्यांनी सुद्धा त्या वस्तु दिले नसल्याचे कबुल केले. तपासी अधिकारी श्री. जाधव (साक्षीदार क्र.५) यांनी देखील खबरी यांनी त्यांच्याकडे रक्ताने माखलेली साडी दिली नसल्याचे सांगितले. खबरी, खबरी यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) व तपासी अधिकारी श्री. जाधव (साक्षीदार क्र.५) यांनी दगड आर्टिकल–अ ओखण्याबाबत त्यांना पोलिस स्टेशनला बोलावले नसल्याचे सांगितले. त्यामुळे आरोपींनी खबरी व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांना मारलेला दगड तोच असल्याचा पुरावा अभिलेखावर नाही. तसेच वैद्यकिय अधिकारी डॉ. चव्हाण (साक्षीदार क्र.३) यांनी सुद्धा खबरी व त्यांचे पती अजय (साक्षीदार क्र.६) यांनी त्यांना कशामुळे जखम झाली याबाबत काहीही सांगितले नसल्याचे तसेच पोलिसांनी तो दगड त्यांना दाखवले नसल्याचे कबुल केले. त्यामुळे एकंदरीतच घटनेबाबत शासंकता निर्माण होते.

१२. उपरोक्त साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपींनी खबरी व त्यांच्या पतीला कथित मारहाण करुन शिवीगाळ केल्याची बाब सिद्ध झाली नाही. करीता मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविले आहे.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :

१३ . सबळ पुराव्याअभावी अभियोगपक्ष आरोपी विरुध्द असलेला आरोप सिध्द न करु शकल्याने आरोपीं विरुध्द कुठलाही गुन्हा सिध्द झाला नाही. करीता आरोपी हे निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र.४ करीता</u> :

१४ . वरील सर्व विवेचनांवरुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचीत ठरते. करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ **दिनेश गुलाब मोहिते,** आरोपी क्र.२ **पुष्पा गुलाब मोहिते,** आरोपी क्र.३ **मनिष उर्फ मंगेश गुलाब मोहिते** व आरोपी क्र.४ **मिथुन विश्वनाथ खोकले** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते आहे.

२. आरोपींचा वैयक्तीक जामीन कदबा व बंधपत्र रद्द/अभ्यर्पित करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक ओबड धोबड मुठगोटा मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी अपिलीय न्यायालयात ज्यावेळी नोटीस काढली जाईल त्यावेळेस उपस्थित राहण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता या न्यायालयाकडे द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आले.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.04.06 17:11:43 +0530

मानोरा (ज. तु. कोरेगांवकर )

दिनांक : ०६.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
(न्यायालय क्र.१), मानोरा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (ग्रेड-३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर )<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | ०६.०४.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | ०६.०४.२०२६ |